International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Peer Reviewed Bi-Monthly Vol.6 No.1 Sept – Oct 2018

# कार्ल मार्क्स यांचें साम्यवाद विषयक विचार

**डॉ. योगिराज एस उरकुडे**
राज्यशास्त्र विभाग
भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा.

**प्रस्तावना:**

जगातील कामगारांना तुम्ही एक व्हा तुम्हाला काही गमवायचे नाही गमवायचे आहे ते दुःख आणि जिंकायचे आहे ते जग या विचाराने जगातील कामगारांमध्ये जगण्याची नवी जिद्द निर्माण करणारा साम्यवादी क्रांतीचा पुरस्कार करणारा जगभरातील कामगार वर्गाचा देवदूत कार्ल मार्क्स यांचा जन्म जर्मनीमधील ट्रवेश या गावी 05 मे 1818 ला झाला. बालपणापासून तो अतिशय हुशार होता त्याचे शिक्षण बॉन आणि बर्लिन विद्यापीठात झाले. त्याने वयाच्या 23 व्या वर्षी पीएचडी पदवी मिळविली अध्यापन कार्यात त्याला आवड होती परंतु त्याच्या उग्र आणि क्रांतिकारक विचारामुळे त्याला कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापकाची नोकरी मिळू शकली नाही त्याने व्हेनिस टाईम या वृत्तपत्रात सहाय्यक संपादकाची नोकरी मिळवली पण क्रांतिकारक विचारामुळे ती सोडावी लागली एंजल्स नावाच्या मित्राने त्याला बरीच मदत केली दोघांनी मिळून अनेक पुस्तके प्रसिद्ध केली 1848 मध्ये साम्यवादाचा जाहीरनामा कम्युनिस्ट मेनिफेस्टो नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आणि या ग्रंथाने जगात खळबळ निर्माण झाली फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतीत मार्कचा हात होता जर्मनीत जी क्रांती झाली त्यामुळे त्याच्यावर देशद्रोहाचा आरोप लावून त्याला जर्मनीतून हद्दपार करण्यात आले तो इंग्लंडमध्ये आला आणि त्या ठिकाणी त्याने दास कॅपिटल नावाचा अजरामर ग्रंथ लिहिला दास कॅपिटल हा ग्रंथ म्हणजे साम्यवादाची बायबल मानली जाते अशा जगप्रसिद्ध विचारवंताचे जेवढे समर्थक आहेत तेवढेच त्याचे विरोधक आहेत अशा प्रकारे शास्त्रीय समाजवादाचे विचार मांडणारा कार्ल मार्क्स यांचे निधन 14 मार्च 1883 ला झाले आणि जगातील कामगार एका महान विचारवंताच्या विचारापासून पोरके झाले.

**साम्यवादाची संकल्पना :-**

इसवी सन पूर्व काळात साम्यवादाची संकल्पना प्लेटोने मांडली परंतु स्त्री आणि संपत्ती यांचा साम्यवाद प्रत्यक्षात आणणे शक्य नसल्याचे प्लेटोने मान्य केले त्याची साम्यवादाची कल्पना पुस्तकात राहिली परंतु कार्ल मार्कची साम्यवादाची संकल्पना सर्वसामान्य पर्यंत संपूर्ण जगभर पोहोचली मागच्या विचारानंतरच साम्यवादी संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले

**साम्यवादाचा अर्थ :-**

मार्क्स आणि एंजल्स यांनी 1848 मध्ये कम्युनिस्ट मेनिफेस्टो नावाचा ग्रंथ लिहिला आणि या ग्रंथाने युरोपातच नाही तर संपूर्ण जगभर खळबळ निर्माण झाली त्यांनी या जाहीरनाम्याद्वारे भांडवलशाही कामगारांचे शोषण करते भांडवलदार जास्त नफा मिळावा म्हणून मजुरांना कमी मजुरी देतात मनुष्यबळ ऐवजी यंत्राचा वापर करतात कामगारांची कपात केली जाते या सूचनाचा परिणाम म्हणून संपूर्ण जगातील कामगारांनी संघटित होऊन भांडवलशाही विरुद्ध क्रांतिकारी व भांडवलशाही व्यवस्था नष्ट करावी क्रांतीनंतर निर्माण झालेल्या व्यवस्थित कोणताही वर्ग असणार नाही आणि वर्ग संघर्ष असणार नाही यालाच मार्क्स साम्यवादी व्यवस्था म्हणतो

थोडक्यात ज्या व्यवस्थित कुणाचेही शोषण होणार नाही ज्यात संपत्तीचे समान वाटप होईल धर्माला विशेष महत्त्व राहणार नाही व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होईल अशी व्यवस्था म्हणजे साम्यवाद होईल एकूणच वर्ग विरहित व शोषणमुक्त समाज म्हणजे साम्यवाद हा अर्थ मार्क्सला अभिप्रेत होता.

**साम्यवादाची वैशिष्ट्ये**

**१) संपत्तीचे राष्ट्रीयकरण :-** साम्यवादी समाजात संपूर्ण संपत्तीचे व उत्पादन साधनांचे राष्ट्रीयकरण केले शेती उद्योगधंदे व्यापार दळणवळणाची साधने यावरील व्यक्तीची किंवा त्याच्या कुटुंबाची मालकी नष्ट केली व ते संपूर्ण

समाजाच्या मालकीचे केले कोणत्याही व्यक्तीला आपली स्थायी मालमत्ता वाढता येणार नाही आणि कोणताही कामधंदा न करता त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर चैन करता येणार नाही.

**२) वर्ग विरहित समाज:-** साम्यवादी समाजात खाजगी संपत्ती राहणार नाही उत्पादनाच्या साधनावर कोणत्याही व्यक्तीची मालकी राहणार नाही त्यामुळे समाजात गरीब श्रीमंत श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव होणार नाही प्रत्येक व्यक्ती समान आहे व्यक्तीच्या पात्रतेनुसार विकासाची समान संधी असावी उत्पादनाची साधने सर्वांच्या मालकीची असावी समाजात कोणतीही वर्ग राहणार नाहीत म्हणजे वर्ग विरहित समाज होय.

**३) शोषण मुक्त समाज :-** भांडवलशाही शोषणाचा परिणाम म्हणजे साम्यवादी समाजाची निर्मिती होय. कुणालाही कुणाचेही शोषण करता येणार नाही या समाजात शोषणाला वाव राहणार नाही मालक आणि मजूर हे वर्ग नष्ट झाल्यामुळे आणि खाजगी संपत्ती बाळगण्याला विरोध केल्यामुळे कुणीही शोषण करणार नाही सर्वांना योग्यतेनुसार काम व वेतन दिले जाईल अशा प्रकारे शोषणमुक्त समाज हे साम्यवादाचे वैशिष्ट्य आहे.

**४) संपत्तीचे समान वाटप :-** साम्यवादी समाजात प्रत्येक व्यक्तीला त्याच्या योग्यतेनुसार काम व वेतन दिले जाते अन्न वस्त्र निवारा शिक्षण व आरोग्य या आवश्यक गरजा पूर्ण करण्याची हमी साम्यवादी समाजात दिली जाते त्यामुळे आर्थिक समता किंवा संपत्तीचे समान वाटप हे साम्यवादाचे वैशिष्ट्य ठरते.

**५) धर्माला विशेष महत्त्व नाही :-** कार्ल मार्क्स स्वतः ईश्वराला मानणारा नव्हता. धर्म ही अफूची गोळी आहे असे त्याचे मत होते त्यामुळे मार्क्सवादी विचारसरणीत धर्माला महत्त्व दिले जात नाही 1917 च्या रशियातील क्रांतीनंतर तेथे काही वर्ष चर्च च्या इमारतीला कुलूप लावून बंद केले होते परंतु काही काळानंतर ती उघडण्यात आली.

**६) व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास :-** साम्यवादी समाजात प्रत्येकाचा प्राथमिक गरजा म्हणजे जीवनावश्य गरजा पूर्ण करण्याची हमी असते अन्न वस्त्र निवारा शिक्षण व आरोग्य या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागत नाही त्यामुळे प्रत्येकाला आपला सर्वांगीण विकास करण्याची संधी मिळते.

**७) सहकारी तत्त्वाचा विकास :-** साम्यवादी समाजात शेती उद्योग व्यापार अशा सर्व क्षेत्रात सहकारी तत्त्वाला महत्त्व दिले जाते सर्व क्षेत्रातील विकासाचा मुख्य आधार सहकाराचे तत्व होय सहकारी तत्त्वामुळे साम्यवादी समाजात अतिशय जलद गतीने विकास होतो अशा प्रकारे वर्ग विरहित शोषणमुक्त समानतेवर आधारित धर्माला विशेष महत्त्व न देणारा व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारा समाज म्हणजे साम्यवादी समाज होय.

**संदर्भग्रंथ**

१) प्रा.रा.ज लोटे "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स ,नागपूर.
२) प्रा. अरविंद शृंगारपुरे, "भारतीय राजकीय विचार", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
३) डॉ. भा. ल.भोळे, "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर